॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनीधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २०२४-२५ च्या २८९.१६ कोटी रूपयांच्या अर्थसंकल्पाला शनिवार दिनांक २३ मार्च रोजी अधिसभेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात १९.५५ कोटी रूपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची बैठक झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड अमोल पाटील यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी सविस्तर अर्थसंकल्पीय अभिभाषण करतांना विद्यापीठाच्या विकासाचा आढावा घेत मागील अर्थसंकल्पातील तरतूदींचा मागोवा देखील घेतला. सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प ३०८.०३ कोटींचा होता. गतवर्षी २४.३० कोटींची तूट दर्शविण्यात आली होती. विभागवार आढाव्यानंतर सुधारित म्हणून १५.९८ कोटी तूटीचा सादर करण्यात आला. अर्थसंकल्पाचा फुगवटा कमी करणे हा दृष्टीकोन समोर ठेऊन यावर्षीच्या अर्थसंकल्पात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या.

यंदाचा अर्थसंकल्प २८९.१६ कोटी रु. एवढा असून तूट १९.५५ कोटी रु. एवढी आहे. यंदा गतवर्षीच्या तुलनेत तूट ४.७५ कोटींनी कमी झाली आहे. या अर्थसंकल्पात परिक्षणासाठी १९६.४६ कोटी, योजनांतर्गत विकासासाठी ४३.५१ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ४९.१९ कोटी तरतूद आहे. अर्थसंकल्प मांडल्यानंतर अमोल मराठे व प्रा.एकनाथ नेहेते यांनी दिलेल्या कपात सूचनेअंती चर्चा झाल्यानंतर त्यांनी कपात सूचना मागे घेतली. अर्थसंकल्पावर सदस्यांनी सविस्तर चर्चा केल्यानंतर सभागृहाने अर्थसंकल्पाला मान्यता दिली. त्याआधी प्रश्नोत्तरांचा तास झाला. या तासात दीपक पाटील, अमोल मराठे व दिनेश चव्हाण, दिनेश खरात यांच्या प्रश्नांना सीए. रवींद्र पाटील, अमोल पाटील, प्रा. अनिल डोंगरे यांनी उत्तरे दिली.

अधिसभेच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यावेळी उपस्थित होते. कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी बैठकीचे सुत्रसंचालन केले. या बैठकीला प्राचार्य एस.एस.राजपूत, प्रा.एस.टी.भूकन, प्रा.जगदीश पाटील, प्रा.योगेश पाटील,विजय आहेर, डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, डॉ.दिनेश पाटील, प्रा.आशुतोष पाटील, प्राचार्य संजय सुराणा, प्राचार्य के.बी.पाटील, प्राचार्य सखाराम पाटील, प्राचार्य इंद्रसिंग पाटील, एस.टी.पाटील, विलास जोशी, प्रा.एकनाथ नेहते, प्रा. संदीप नेरकर, प्रा.शिवाजी पाटील, प्रा.गजानन पाटील, प्रा.जयवंत मगर, डॉ.मंदा गावीत, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. पदमाकर पाटील, प्रा. वर्षा पाटील, डॉ.पद्माकर पाटील, प्रा.धीरज वैष्णव, प्रा.विशाल पराते, प्रा.किर्ती कमलजा, अमोल पाटील, अमोल मराठे, अमोल सोनवणे, नितीन झाल्टे, दिनेश चव्हाण, दिनेश खरात, स्वप्नाली महाजन, नितीन ठाकूर, केदारनाथ कवडीवाले, भानूदास येवलेकर, नरेंद्र नारखेडे, ॲड केतन ढाके, जयंत उत्तरवार, नेहा जोशी, मिनाक्षी निकम, दीपक पाटील, सुरेखा पाटील, ऋषीकेश चित्तम उपस्थित होते. सर्व सदस्यांनी विविध विषयांवर तसेच अर्थ संकल्पावरील चर्चेत भाग घेऊन काही उपयुक्त सूचना केल्या.

### बातमी क्र. २

जळगाव दि.२३ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेंट्रल ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलच्या वतीने विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी रोजगारासाठी आवश्यक असलेली कौशल्ये या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

## जनसंपर्क विभाग

चार दिवस चाललेल्या या कार्यशाळेत रागीब अहमद, घोसोद्दीन खान, राहुल त्रिवेदी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रोज २०० विद्यार्थी कार्यशाळेसाठी उपस्थित होते. ताण-तणावाचे व्यवस्थापन, संभाषण कौशल्ये, समुह चर्चा, वैयक्तिक मुलाखत या विषयावर तज्ञांनी संवाद साधला. या सेलचे समन्व्यक प्रा. रमेश सरदार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ.उज्व्ल पाटील, हे देखील उपस्थित होते. प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले.

### बातमी क्र.- ३

जळगाव दि.२३ (प्रतिनीधी) : नवी दिल्ली येथे दि. १८ ते २० मार्च दरम्यान झालेल्या स्टार्ट-अप महाकुंभात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲण्ड लिंकेजेस सेंटरच्या पाच स्टार्ट-अप सहभागी झाले होते.

केसीआयआयएल चे हेल्दी क्रम्ब्स प्रा.लि., परिवर्तन प्रा.लि., राम ॲन्टीव्हायरस प्रा.लि., डी.आर.टी. फ्लाय प्रा.लि., इन्वेटो प्रोसेसिंग टूल प्रा.लि. या पाच स्टार्ट-अप ची या महाकुंभासाठी निवड करण्यात आली होती. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, संचालक डॉ.राजेश जवळेकर, प्रा,भुषण चौधरी, प्रा.विकास गीते यांनी मार्गदर्शन केले. इन्क्युबेशन मॅनेजर सागर पाटील, समन्वयक योगेश पाटील यांनी टीम चे नेतृत्व केले. या स्टार्ट-अप महाकुंभात भारत इनोव्हेटस या मध्यवर्ती थिमसह कार्यक्रमात चर्चा, अनेकांशी संवाद साधता आला. सहभागी झाल्यामुळे मोठा मंच मिळाला व भविष्यातील उद्योजकतेकडे कशा पध्दतीने बघता येईल याची दृष्टी मिळाल्याची भावना या स्टार्ट-अपच्या संचालकांनी व्यक्त केली.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २३ मार्च, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी